माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००११५

अपिलार्थी श्री. विरेंद्रसिंह वीणा भोजराजसिंह वाघेला

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
माहिम विभाग, माहिम पोलीस ठाणे आवार, मुंबई-४०० ०१६

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपो समोर, मुंबई ४०० ०१६.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
१५.०९.२०२५	०५.११.२०२५	१६.१०.२०२५	०३.११.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०५.११.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०३.११.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १५.०९.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) समाधान उगले यांचा पदाची माहिती सरकारी नोकरीसाठी अपॉन्टमेंट लेटर सादर केल्याची माहिती कास्ट सर्टीफिकेट ची माहिती रूजू झाल्या पासून आज रोज दि. १५.०९.२०२५ पर्यत करण्यात आलेली कार्यवाही माहिती show cause Notice ccs Rules Rule अंतर्गत पत्र सहपत्र नोटीसची माहिती नोटीस विरूध्द सादर केलेला माहिती आज रोज पर्यत दि. १५.०९.२०२५ रोजी करण्यात आलेली शिक्षाची माहितीची पत्र सहपत्रची माहितीची तपशीलवार माहितीची माणित प्रत द्यावी.*
(२) मी केलेला तक्रार अर्ज दि. ०४.०१.२०२५ रोजी विरूध्द कुढल्या कायदा अंतर्गत FIR घेतली नाही. माहितीची प्रमाणित प्रत द्यावी."

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०५.११.२०२५ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी माहिती, जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही

..२/-

संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबतीत आगंतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशिल यासंबंधातील माहिती, माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये कलम ८(१)(त्र) नुसार नाकारण्यात येत आहे.

मुद्दा क्र. (२) बाबत कळविले की, आपण केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने BMC कडून कोणताही जन्म दाखल्यात कोणताही फेरफार आलेला नाही, अशी माहिती देण्यात आली. त्यामुळे नमुद माहितीबाबत कोणतातही दखलपात्र गुन्हा निष्पन्न होत नसल्याने FIR घेण्यात आलेली नाही. BMC कडून मिळालेल्या माहितीच्या प्रत सोबत जोडण्यात आले आहे.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १६.१०.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.११.२०२५ रोजी अपिलार्थींना पुरविलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी पोलीस अधिकाऱ्याची अपॉइटमेंट लेटर, जात प्रमाणपत्र व मिळालेली शिक्षा विषयी माहिती विचारली होती. जे की, उपलब्ध करुन दिलेली नाही.

६. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींनी मागणी केलेला सेवाविषयक तपशिल माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(त्र) अन्वये नाकारण्यात आली. जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, आता संबंधीत अधिकारी त्यांच्या आस्थापनेवर कार्यरत नसून त्यांची पोलीस आयुक्त, पुणे यांच्या आस्थापनेवर बदली झाल्याने त्यांचे सेवाविषयक अभिलेख उपलब्ध नाहीत.

७. मा. उच्च न्यायालय संभाजीनगर खंडपीठ यांनी रिट याचिका क्र. ४०७५/२०१५ मध्ये दि.०८.०४.२०२६ रोजी दिलेले आदेशामधील परिच्छेद- १६ मध्ये नमुद केले आहे की, सेवाविषयक अभिलेख वैयक्तिक माहिती आहे व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(त्र) अन्वये त्रयस्थ व्यक्तीची माहिती अपिलार्थींना उपलब्ध करुन देता येत नाही.

८. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई